ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## JANUARY SPECIAL ISSUE V 2022



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with CamScan

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Editor**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

Scanned with CamScan

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | A Problem of Child Labour in Solapur City | Shri. D. M. Shinde. | 1-4 |
| 2 | Research Paper / Article Writing | Dr. Sanjay Bhedekar | 5-8 |
| 3 | Evidence-Based Assessment Tools For Common Mental Health Problems: A Practical Guide For School Settings | Dr.Patwardhan Rathod | 9-13 |
| 4 | An Overview: Application on Web- based Services in Academic Libraries | Sarika Bhagwanrao Rengunthwar | 14-17 |
| 5 | Information Seeking Behavior in Research -A Study of Faculties in Savitribai college of Art's, Ahmednagar District, Maharashtra | Prof. Shahaji M. Takawane | 18-23 |
| 6 | Benefits and Challenges of Practicing Teakwondo to Adolescents | Dr. Shirke Ravindra Dattatraya | 24-28 |
| 7 | Silhouette of Muslim Minority Girls Pursuing College Education : A Case Study of Al-Ameen College, Belgaum | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P. | 29-39 |
| 8 | १९०० ते २००० या कालखंडातील स्त्रियांचे वैचारिक लेखन | सौ.ज्योत्स्ना एकबोटे | 40-48 |
| 9 | ग्रामीण कथा : १९८० नंतरच्या ग्रामीण कथालेखिका | श्री.भारत रामजी बांडे<br>डॉ.राहुल राजाराम हांडे | 49-54 |
| 10 | कादंबरी निर्मिती प्रक्रिया : एक आकलन | प्रा.डॉ. गोपीनाथ पांडूरंग बोडखे | 55-58 |
| 11 | कागूद - शेतीनिष्ठ मराठी संस्कृतिचा कणा | प्रा. कृष्णा रतनराव बनसोडे | 59-65 |
| 12 | महाराजा सयाजीराव गायकवाड आणि त्यांचे साहित्य प्रेम | भक्ती प्रसाद गावस | 66-74 |
| 13 | महिला सबलीकरण आणि मराठी साहित्य | डॉ.विकास बहुले | 75-80 |
| 14 | महाराष्ट्रातील लोकसाहित्याच्या अभ्यासाचे स्वरूप | प्रा. डॉ. शत्रुघ्न फड | 81-87 |
| 15 | शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कवितेतील मानुषता | प्रा.प्रमोद नारायणे | 88-93 |
| 16 | मध्ययुगीन काळातील स्त्रीजीवन : एक दृष्टीक्षेप | डॉ.राजेंद्र सुकदेव चौधरी | 94-97 |
| 17 | माझी मऱ्हाटीचि बोलु कौतुके | डॉ.धनपाल कांबळे | 98-101 |
| 18 | महाविद्यालय छात्रो के लिए रोजगार के क्षेत्र | प्रा.डॉ.वैशाली शालिग्राम कंकाळे | 102-108 |
| 19 | स्वतंत्रता आंदोलन में विनोबा का योगदान | डॉ.सालीम बनादार | 109-115 |
| 20 | डॉ.बाबासाहेब अंबेडकर केराजनीतिक चिंतन | डॉ.सिध्देश्वर सटाले | 116-117 |



Scanned with CamScanner

# मध्ययुगीन काळातील स्त्रीजीवन : एक दृष्टीक्षेप

**डॉ.राजेंद्र सुकदेव चौधरी**
मराठी विभाग
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि.नांदेड

भारतीय संस्कृती ही वैदिक तत्वज्ञानावर आधारित असल्याने, हिंदू जीवनप्रणाली ही वैदिक धर्माच्या आचरणातून अस्तित्वात आलेली आहे. त्यांचे त्यांचे तत्वज्ञान हे विषमतामुलक असल्याने येथे मानवा-मानवांत आणि स्त्री-पुरूषांत भेद निर्माण झालेला दिसून येतो. या काळातील संपूर्ण समाज हा धर्माधिन झालेला दिसतो. हीच परिस्थिती महाराष्ट्रातही होती. एकंदरित मध्ययुगीन काळातील समाजजीवन हे सनातन धर्माच्या प्रभावाखाली वावरत होते; परंतु प्राचीन काळातील धर्माचरणाची शिस्त जी समाजाला लाभलेली होती. ती या काळातील आणि त्याच्या आधिच्या म्हणजे श्रृती,स्मृति,पुराणोक्तच्या काळातील धर्मशास्त्र मिमांसकांनी धर्मबंधनांचे अवडंबर माजविले होते. जसे मनु, याज्ञवल्क्य हेमाद्री पंडीत यांनी सामाजीक जीवन संकुचित करून ठेवले होते. याचा प्रभाव जनसामांन्यावर पडून धार्मिक स्त्रोत माजले होते. तशातच परकियांचे आक्मण झाले आणि अराजकता माजली.

भारतीय समाजावर परकीयांचे आक्मण झाले असतांनाही; इतर देशांतील संस्कृती जशा नष्ट झाल्या, तशी भारतीय संस्कृती ही येथील जातीव्यवस्थेमुळे नष्ट होऊ शकली नाही. ती मुळ स्वरूपात टिकून राहिली याचा प्रतिगामींना अभिमान वाटत असला; तरी भारतीय समाजात अनेक प्रकारची विषमता निर्माण करणाऱ्या या संस्कृतीचे समर्थन करणे चुकीचे ठरेल. कारण धर्माधिष्ठीत लोकजीवनात जातीय विषमता, स्त्री-पुरूष भेद, अज्ञान-अंधश्रध्दा आणि शोषण यांचे दृष्टचक्र हजारो वर्ष तळागाळातील माणसाला त्रस्त करीत आले आहे. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीत सर्वसामान्य माणसांचे सर्वाधिक हाल झालेले दिसून येतात. त्याला प्रस्थापित संस्कृतीच्या चौकटीबाहेर पडता येण्याची मुभा नसल्याने, प्रत्येक काळात त्याची घुसमट झालेली आहे. जातीय विषमतेचे चटके सहन करीत आलेल्या शुद्रातिशुद्रांबरोबरच स्त्रीयांचे जीवनही भारतीय संस्कृतीने कुंठीत करून टाकलेले आहे. हे पाहणे येथे अभ्यासनिय ठरेल.

## ❖ मध्ययुगीन काळातील स्त्रीजीवन :

निसर्गतः शारीरिकदृष्टया स्त्री आणि पुरूष यांच्यात फरक असला; तरी भारतीय संस्कृतीच्या धर्मशास्त्र मिमांसकाने स्त्री-पुरूष भेद कृत्रिमरित्या तयार केला. तत्पुर्वी वेदकाळापासून तर पुराण काळापर्यंत स्त्रीला पुरूषांबरोबर स्थान होते. प्राथमिक अवस्थेत अश्लिल जीवन जगणाऱ्या



Scanned with CamScan

स्त्री-पुरूष यांच्यातील भावसंबंध एक समान पातळीवरील होते. नैसर्गिकदृष्टया तिला गरोदरपणा ;आणि शारीरिक दुर्बलता व मर्यादा पडत असल्यामुळे तिला बऱ्याचदा पुरूषांवर अवलंबून राहावे लागे. यासंदर्भात चंद्रकला हाटे म्हणतात की, “ अनेक शतके मानवापुढे एकच समस्या होती आणि ती म्हणजे निसर्गाच्या तडाख्यातून व इतर वन्यप्राण्यांपासून आपल्या जीविताचे संरक्षण करावयाचे. पुरूषांबरोबर स्त्रीपण या समस्येला तोंड देत होती. त्याबरोबर मातृत्वाची जबाबदारीही तिला पार पाडावी लागे. सर्व प्रकारच्या प्रतिकुल परिस्थितीत जीवन कलहाला तोंड देता-देता वरचेवर सारख्या येणाऱ्या गरोदरावस्था व प्रसुतिकाल येणे करूनच जीवित रक्षणार्थ तिला पुरूषांवर विसंबून रहावे लागत असल्यास नवल नाही” [1]

यामुळे कष्टाचे व धाडसाचे काम करून स्त्रीच्या रक्षणाची जबाबदारी आपोआपच पुरूषांवर येवून पडली. परंतु शक्य त्या कामात स्त्रीया पुरूषांना मदत करीत त्यातून श्रमविभाजन झाले. असे असले तरी वैदिक काळात स्त्रीला स्वातंत्र्य होते. तिला देवतेसमान पूज्य मानले जायचे. समाजात समानाधिकार आणि समान दर्जा होता. “ त्यांना पुरूषांप्रमाणे स्वयंसिध्द,बौध्दीक,अध्यात्मिक व सामाजिक जीवन होते. अशा जीवनाला आधारभूत भक्कम पाया म्हणून उपयोगी पडणारे शिक्षण स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने मिळे. मुलांप्रमाणेच मुलींचेही उपनयन करण्यात येई. कारण तो संस्कार म्हणजे शिक्षणार्थ गुरूगृही जाण्याचा आरंभ; असे समजले जात होते ” [2] मात्र वेदोत्तर काळात परकीय स्वाऱ्यामुळे स्त्रीयांचे जीवन असुरक्षित बनले. तिच्या रक्षणाची जबाबदारी वडिलांवर किंवा कुटूंबप्रमुखावर येऊन पडली. त्यावेळी तिला घराबाहेर पडण्यास बंधने येऊ लागली. यामुळेच तिच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येऊन,तिचे वैयक्तिक स्वातंत्र्य नष्ट होऊ लागले आणि त्याचवेळी पुरूषांने तिच्यावर स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित केले. येथून स्त्री-पुरूष असमानतेला खऱ्या अर्थानें सुरूवात झाली असे म्हणता येईल. स्मृतीकाळापासून उत्तरोत्तर स्त्रीविषयक दृष्टीकोन अधिक संकुचित होत गेला. तिच्या आत्म-सन्मानाला धार्मिक रूढी,परंपरेची चौकट आखून दिली गेली. तेथून तिच्यावर अनेक बंधने लादण्यात येऊ लागले. तेव्हा असे म्हणता येईल की, “ ज्या भारतभूमीत ही स्त्रीरत्ने जन्माला आली आणि ज्या हिंदू समाजाला त्यांनी आपल्या असामांन्य पावित्र्याने मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. त्याच भूमितल्या,त्याच हिंदू समाजाने भारतीय स्त्रिची जेवढी अप्रतिष्ठा करता येईल तितकी केली आहे. स्त्री चंचल आहे, ती नित्य विकाराधीन असते, स्वातंत्र्यास ती नालायक आहे. तिला बंधनातच ठेवली पाहीजे, ती मोक्ष मार्गातील धोंड आहे. शहाण्याने स्त्रीच्या नादाला लागू नये. तिला विद्येचा, वेदमंत्रांचा, धनाचा कशाचाही हक्क नाही. असे तिच्या विषयीचे अनेक उद्गार हिंदूंच्या धर्मशास्त्रात व इतर वाङ्मयात आढळतात.” [3] यामुळे तिचे परावलंबित्व वाढत जाऊन ती पराधिन होऊ लागली.

गृहयसूत्रे,धर्मसूत्रे,मनुस्मृती आणि याज्ञवल्क्य स्मृती यांसारख्या धर्मशास्त्र ग्रंथाला धर्मशास्त्रकारांनी स्त्रीविषयक कायदयाची चौकट आखून दिली. तिच्या शिक्षणाचे सर्व अधिकार काढून घेऊन तिला शुद्र ठरविले. ती स्वातंत्र्यास अपात्र असल्याचे सांगितले. तिचे व्यक्तीस्वातंत्र्य



Scanned with CamScan

आणि वैयक्तिक अधिकार हिरावून घेतले. घटस्फोटास मान्यता दिली नाही. त्यामुळे ती वैवाहिक जीवनात निमुटपणे पुरूषाचे अत्याचार सहन करत राहिली व वरचेवर दुर्बल बनत गेली. विधवेच्या पुनर्विवाहास बंदी घालून तिला सती जाण्यास भाग पाडले. विधवेचे केशवपण करून तिला चांगले कपडे व दागदागिणे घालण्यास मज्जाव करून,तिला कुरूप बनविण्यात येऊ लागले. एकुणच स्त्रीच्या वाटयाला यातनामय जीवन आले. " अर्थात कोणत्याही स्त्रीला तिचे आई-बाप, सासु-सासरा आणि नवरा यांच्या शब्दात राहावे लागत होते. परित्यक्तेचे जीवन व्यतीत करणाऱ्या स्त्रीला दुसऱ्याच्या घरी स्वयंपाकपाणी,दळणकांडण अशा प्रकारचे मोलाचे काम करून उदरनिर्वाह करावा लागे. विधवांची परिस्थिती तर अत्यंत केविलवाणी होती. नवऱ्याच्या मृत्युनंतर त्याच्या विधवा स्त्रीला आपल्या भावाच्या घरी सर्व प्रकारचे कष्ट उपसित जीवन कंठावे लागत होते. हक्काचे स्त्रीधन जरी मिळाले; तरी त्याच्या विनियोगासाठी स्त्रीला पुरूषाचेच सहाय्य घ्यावे लागे. अशाप्रकारे यादव काळातील सामान्य स्त्री 'अबला' या संज्ञेला पुर्णपणे पात्र होती." [4] तिच्या इच्छा,आकांक्षा,भावना याला कुटंबात आणि समाजात महत्व राहिले नाही. उलट तिला गौण स्थान दिले गेले. तिचा छळ केला गेला. संपत्तीचा वारसाहक्क डावलला. तिच्या पातिव्रत्याला महत्व दिले गेले. पतीची निष्ठा राखणे हाच तिचा धर्म मानला गेला. पुरूषांशिवाय तिचे जीवन असुरक्षित बनून राहिले. अर्थातच " स्त्रीजीवन अतिशय परावलंबी असे. स्त्रीधनाचा उपयोग ती स्वच्छेने करू शकत नसे; सासुरवासाचा तिला जाच असे. विधवेचे जीवन तर अतिशय दयनीय असे. संपत्ती नसल्यास व माहेरचा आश्रय नसल्यास तिला इतरांकडे, स्वयंपाकपाणी व दळण-कांडण करून पोट भरावे लागे." [5]

❖ मध्ययुगीन समाजातील स्त्रीचे स्थान :

भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान असल्यामुळे तिच्यावर अन्याय, अत्याचार व्हायचा. तिला कुठल्याच प्रकारचे स्वातंत्र्य नसल्यामुळे,कुटूंबात दुय्यम स्थान दिले जायचे; सासुकडून तिचा खूप छळ व्हायचा, पतीकडून मारझोड व्हायची, अशावेळी माहेरच्या प्रेमाचा तिला आधार वाटायचा. तसेच लहानपणी लग्न झाल्यापासून आणि तिला शिक्षणाचा अधिकार नसल्यामुळे तिच्या वाटयाला अज्ञान येई. या अज्ञानामुळेही तिला यातनामय जीवन जगावे लागत असे. तिची निंदा केली जायची. म्हणजेच स्त्रीची सर्व बाजुंनी कोंडी झालेली होती. तिच्या वाटयाला कष्ट, उपेक्षा, अवहेलना आलेली होती. वैवाहिक संस्थेमध्ये पडलेल्या मर्यादा तिच्या जीवनाला व्यापून राहिल्या. मान-आत्मसन्मान बाजूला ठेऊन तिने पतीच्या कुटूंबातील लहान-मोठयांचा आदर करावा; असा अलिखीत नियमच झाला होता. यातूनच सासरी तिचा छळ होऊ लागला. यामुळे तिला माहेरची अधिका-धिक ओढ लागायची. हे सर्व सहन करत पतीसोबत आयुष्य घालवित असतांना जर कदाचित दुर्दैवाने तिच्या पतीला मृत्यू आला; तर तिने पतीच्या मृत्युनंतर जगूच नाही. असे धर्मशास्त्रकारांचे म्हणणे होते. " तेव्हा साधारणतः असे दिसते की, धर्मशास्त्राचा प्रारंभापासूनच विधवा विवाहाविरूध्द कटाक्ष आहे. पतीच्या मागे स्त्रीने व्रतस्थ राहून, धर्माचरणात निमग्न राहून काळ कंठावा असाच सर्वानी उपदेश केलेला आहे. पण अनेक शास्त्रकारांना पतीच्या मागे स्त्रीने



Scanned with CamScan

जिवंत राहावे हेच मान्य नाही. तिने सती जावे हाच तिचा श्रेष्ठ धर्म होय. असे त्यांचे मत आहे."[6] शिवाय जगलीच तर तिने कुकर्म करू नये. म्हणून तिला विद्रुप करण्यात येत असे. नाहीतर बळजबरीने सती जाण्यास भाग पाडले जायचे. मात्र असे असले तरी काही समाजातील स्त्रीयांना घटफोस्टाची व पुनर्विवाहाची मुभा होती. मात्र त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन चांगला होताच असे नाही.

अशाप्रकारे स्त्रीयांची सर्व पातळीवर कोंडी झाल्याने, कोणात्याही प्रकारच्या आपत्तीची सर्वात जास्त झळ तिलाच पोहचायची. कारण तिला हिन दर्जा दिला गेल्यामुळे तिच्या सुरक्षिततेची हमीच राहिलेली नव्हती. अन्नधान्याच्या टंचाईच्या काळात तर कुटूंबातील पुरूषांपेक्षा तिची उपासमार अधिक व्हायची. तिचे भरण-पोषण व्यवस्थित न झाल्यामुळे बाळंतपणात तिला मुत्यु येई. शिवाय अल्पवयात लग्न झाल्यामुळे मुले जन्माला घालतांना तिच्या शरीराची झिज होऊन, क्षयसारख्या आजारांना ती बळी पडायची, म्हणून या काळातील स्त्रीयांच्या मुत्युचे प्रमाण अधिक आढळते. यातूनच ती समाजातील अनिष्ट रूढी, प्रथांनादेखील बळी पडत गेलेली दिसते.

यावरून असे म्हणता येईलक की, मध्ययुगीन काल खंडापासून स्त्रीजीवनाला अनेक जोखडयुक्त बंधनांत बांधले गेल्याचे जाणवते. आजही स्त्रीजीवनाची ही दुर्दशा कमी झालेली आहे. असे म्हणता येणार नाही. आजच्या समाज जीवनातदेखील तिला पुरूषप्रधान संस्कृतीला बळी पडावे लागत असल्याचे चित्र दिसून येते. एकंदरीत मध्ययुगीन काळापासून तर अद्याप पर्यंत दुय्यम वा कनिष्ठ तसेच हिन दर्जा या संस्कृतीने स्त्रीजीवनाला दिला. असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

❖ संदर्भ सूची :

1. भारतीय स्त्री : स्त्रीजीवनातील संकमण : चंद्रकांत हाटे, पृष्ठ-113
2. स्त्री जीवनातील नवी क्षितीजे : कमलाबाई टिळक पृष्ठ-03
3. महाराष्ट्र संस्कृती : डॉ.पु.ग.सहस्त्रबुध्दे, पृष्ठ-119
4. महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास : ह.श्री.शेणोलीकर, पृष्ठ-103
5. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास आणि भारतीय प्रबोधन :प्रा.ब.लु.सोनार,श.द.सबनीस पृष्ठ-37
6. महाराष्ट्र संस्कृती : पु.ग.सहस्त्रबुध्दे, पृष्ठ-204,205

◆◆◆



Scanned with CamScan